# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

## (पोलीस वार्तापत्र)

## सायंकाळ

---

### दिनांक 11.06.2019 मंगळवार

### (गुन्हे)

**1) पो.स्टे नंदनवन, कळमणा – विनयभंग :**

**अ) नंदनवन** – दिनांक 10.06.2019 चे 1442 चे सुमारास पो.स्टे. नंदनवन हद्दीत राहणा–या 23 वर्षीय फिर्यादी यांचे पतीचे मोबाईच्या व्हॉट्सअॅप वर आरोपी अक्षय अरूण शेंडें, रा. बाबुळखेडा, नागपूर याने फिर्यादीचे अश्लिल फोटो व व्हिडीओ पाठवून बदनामी केली. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. नंदनवन येथे पोउपनि भवाळ, 9922995726 यांनी आरोपीविरूध्द कलम 354(अ) भादंवि सहकलम 67(अ) आयटी अॅक्ट अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**ब) कळमणा** – दिनांक 15.01.2019 ते दिनांक 05.06.2019 दरम्यान पो.स्टे. कळमणा हद्दीत राहणारी 28 वर्षीय फिर्यादी यांचे नातेसंबधातील आरोपी (सासरा) याने फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून विनयभंग केला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. कळमणा येथे पोहवा प्रभाकर, 9037348713 यांनी आरोपीविरूध्द कलम 354 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

### (अकस्मात मृत्यु)

**पो.स्टे. बेलतरोडी, कोतवाली, पाचपावली, तहसिल :**

**1) बेलतरोडी** – दिनांक 11.06.2019 चे 0800 वा चे सुमारास माधव शामराव वांगे, वय 41 वर्ष रा. माता मंदीर जवळ, खापरी, नागपूर हे ट्रक चालक असून ते पो.स्टे. बेलतरोडी हद्दीत वर्धा रोड खापरी येथे ट्रक क्र. एनएल/08/डी/3066 च्या कॅबिनमध्ये मृत अवस्थेत मिळून आले. याप्रकरणी फिर्यादी शेखर शामराव वांगे, वय 43 वर्ष यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. बेलतरोडी येथे पोउपनि जायभाये, 9552538098 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

**2) कोतवाली** – दिनांक 07.06.2019 चे 2300 वा चे सुमारास पो.स्टे. कोतवाली हद्दीत स्वामी समर्थ निवास दक्षिणामुर्ती चौक, महाल, नागपूर येथे राहणारे नितीन बबनराव चुटे, वय 38 वर्ष यांनी कोणतेतरी विषारी औषध प्राषन केल्याने त्यांना उपचाराकरीता होप हॉस्पिटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक 11.06.2019 चे 1230 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी फिर्यादी मनोज प्रभाकर कोहडे, वय 34 वर्ष यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. कोतवाली येथे मपोउपनि तराडे, 8390418656 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

**3) पाचपावली** – दिनांक 10.06.2019 चे 1930 वा चे सुमारास पो.स्टे. पाचपावली हद्दीत तांडापेठ नागपूर येथे राहणारे निसार अहमद खलील अहमद, वय 42 वर्ष यांची प्रकृती खराब झाली असता त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. पाचपावली येथे पोउपनि शिसोदे, 9765763763 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

**4) तहसिल** – दिनांक 11.06.2019 चे 1205 वा चे सुमारास अंदाजे 45 वर्ष वयोगटातील एक अनोळखी इसम हा पो.स्टे. तहसिल हद्दीत गांधीबाग जलालपुरा येथे दुकानासमोर बेशुध्द अवस्थेत मिळून आला. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी फिर्यादी विवेक सुभाष डुमळे, वय 26 वर्ष रा. सानगडी साकोली, भंडारा यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. तहसिल येथे पोउपनि फरताळे, 7517566082 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

(ईतर)

1) गुन्हे शाखा, युनिट क. 2 पोलीसांची कामगिरी :

ऑपरेशन वॉश आउट संबधाने वरिष्ठानी दिलेल्या निर्देशनाचे अनुषंगाने दिनांक 10.06. 2019 चे 2323 वा चे नागपूर महानगर पालीका समोर सिव्हील लाईन सार्वजनिक जागी सोबतचे स्टाफ सह पेट्रोलिंग करीत असतांना आरोपी क 1) योगेश उर्फ लकी रमेश शाहु वय 23 वर्ष रा. मागंपुरा दसरा रोड, महाल व क.2) नितीन दिलीप रेवडीया वय 30 वर्ष रा. नरसाळा रोड हुडकेश्वर हे संशयास्पद स्थितीत आएळले व पोलीस स्टाफला पाहुन पळण्याचे बेतात असतांन त्यास स्टज्ञफचे मदतीने कायदेशिरित्या ताब्यात घेतले यातील आरोपी क. 1 बाबत गुन्हे अभिलेखाची पडताळणी केली असता आरोपी इसमास मा. पोलीस उपआयुक्त परि 3 नागपूर शहर याचे हद्दपार आदेश क. 14/2017 दिांक 27.07.2017 तामिल तारिख 28.07.2017 अन्वये नागपूर श्ज्ञहर व नागपूर जिल्हा हद्यीतून 2 वर्षा करीता हद्दपार करण्यात आले असून नमुद आरोपी इसमाने कोणत्याही प्रकारच पुर्व परवानगी न घेता नमुद घटनास्थळी वावरतांना मिळून आल्याने आरोपी विरूध्द गुन्हा कलम 142 महापोलीस कायदा अन्वये होत असल्याने नमुद आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी क. 2 चे बाबत गुन्हे अभिलेखावर पाहणी केली असा सदर आरोपी पोस्टे सक्करदरा येथे दाखल अप क. 65/19 कलम 379 भादंवि मध्ये फरार असल्याचे समजल्याने त्यास पोस्टे सक्करदरा स्वाधीन करण्यात आले.

आरोपी क. 1 यास विश्वासात घेवून विचारपुस केली असता सदर आरोपीने पोसटे सक्करदरा अप. क. 107/19 कलम 454,457,380 भादंवि तसेच पोस्टे हुडकेश्वर अप. क. 36/19 कलम 379 भादंवि या गुन्हा केल्याचे कबुली दिली. त्यांचेकडुन जळालेल्या इलेक्ट्रिक वायरचे ताब्यांचे तार अंदाजे 10 किलां कि. 7000 रू मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. अपर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री. निलेश भरणे, सपोआ श्री सुधिर नंदनवार, पोनि अनिल ताकसांडे योच मार्गदर्शनाखाली सपोनि जितेद्र बोबडे, सपोउपनि मोहनलाल शाहु, विनायक पांडे, पोहवा प्रशांत देशमुख, संतोष मदनकर, नापोशि संतोष निखार, मंजितसिंह, पोशि योगेश गुप्ता, सागर ठाकरे, चालक पोहवा तायडे, अरविंद झिल्पे यांनी केली आहे.



2) पो.स्टे. तहसिल पोलीसांची कामगिरी :

दिनांक 10.06.2019 रोजी 1800 वा चे सुमारास फिर्यादी पोहवा किशोर महंत, हे स्टाफसह वॉश आउट पेट्रोलींग दरम्यान मिळालेल्या माहिती वन ज्योतीनगर खदान नमक कारखाना धम्मदीप बौध्दविहार समोर सार्वजनिक ठिकाणी आरोपी गुजन उर्फ चिंटु विश्वजीत हुमणे वय 24 वर्ष रा. ज्योतीनगर खदान नमक कारखाना धम्मदीप बौध्दविहार समोर बागडे यांच्या घरी किरायाने हा एक जंगलेल्या तलवारीसह मिळून आला वरून सदर ईसम बाबत शहनिशा केली असता नमुद इसम हा मा. पोलीस उपआयुक्त परि. क3 नागपूर शहर यांचा हद्दपार आदेश क. 30/18 दिनांक 19.12.2018 पासुन ते दिनांक 19.12.2019 पर्यत नागपूर शहर व न ागपुर ग्रामीण हद्दीतून एक वर्षा करीता हद्दपार केले. असल्याचे निर्देशनास आल्याने त्यास घटनास्थळी येण्याबाबत परवानगी विचारल असता त्याने कोणते ही लेखी परवानगी नसल्यचे सांगितले वरून त्याला ताब्यात घेण्यात आले. सदरहु ईसमाने मा महाराष्ट्र राज्य गृह मंत्रालय याचे मनाई परिपत्रकाचे तसेच मा. सह पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे

मनाई आदेश कलम 37(1)(3) मपोका चे उल्लघंन केल्याने तसेच मा. पोलीस उपआयुक्त, परि. क्र. 3, यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन 1951 चे कलम 56(1)(अ)(ब) निघालेल्या आदेशाचे भंग केल्याने असल्याचे निर्देषनास आल्याने त्यास घटनास्थळी येण्याबाबत परवानगी नसल्याने सदर आरोपीचे कृत्य कलम 142 मपोका सहकलम 4,25 आर्म ॲक्ट अन्वये होत असल्याने सदर आरोपी विरूध्दात गुन्हा दाखल करण्यात येवून आरोपी यास अटक करण्यात आली.

वरील कामगिरी श्री. हर्ष पोद्दार मा. पोलीस उपायुक्त, परि क्र. 5, नागपूर शहर व श्री. राहुल माखनीकर, मा. पोलीस उपायुक्त परि. क्र3 श्री. राजरत्न बनसोड सपोआ कोतवाली विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि अजयकुमार मालविय, सपोनि रामदास पाटील, पोहवा किशोर महंत, नापोशि अनिल चतुर्वेदी, नापोशि सचिन टापरे, पोशि शम्भुसिंग किरार, राजेश धोपटे, सुरज ठाकुर यांनी केली आहे.

**3) शहरातील नाईट राऊंड अधिकारी बाबत :–**

नागपूर शहरात आज दि. 11.06.2019 रोजी मा. पोलीस उप आयुक्त, (परि. क्र.5) श्री हर्ष पोद्दार, हे नाईट राऊंड करणार आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर